PR022 (12)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
# विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

विद्याविकास | स्वररंग

डॉ. संतोष परचुरे
संचालक

संदर्भ क्र.विविमं / 2022-23/325/037

दिनांक :-१८ Jan २०२३

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी तुळजाराम चतुरचंद
महाविद्यालय पत्ता: बारामती ता.: बारामती जि: पुणे
पिनकोड: 413102

विषय :-Lighting for professional photography

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ व आपले महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने Lighting for professional photography ('ब' गट) (शासन व स्थानिक प्रशासनाच्या प्रचलित कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक सर्व नियम व निर्बंधांच्या अधीन राहूनच या योजनेची परिस्थितीनुरूप अंमलबजावणी करून) आयोजित करण्यास आपणास मान्यता देण्यात येत आहे. दि. 11 मार्च 2023 पर्यंत Lighting for professional photography आयोजित करण्यात यावी. सदर कार्यशाळा आयोजनासाठी आपल्या महाविद्यालयास रु. 4000 /- पर्यंत अर्थसाह्य मंजूर करण्यात आलेले आहे. या व्यतिरिक्त Lighting for professional photographyकरिता होणारा ज्यादा खर्च महाविद्यालयाने करावा. या कार्यक्रमाच्या संपूर्ण आयोजना दरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने आयोजन होत असल्याचे प्राधान्याने व ठळक नमूद करणे अनिवार्य आहे. याउल्लेखासह या कार्यक्रमाच्या अनुषंगाने विविध प्रसिद्धी पत्रके, प्रकाशने, प्रमाणपत्रे बॅनर, पोस्टर, साहित्य, प्रसिद्धी साधने, समाजमाध्यमे यामध्ये याअनुषंगाने वरील उल्लेखांसह सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बोधचिन्ह असणे अनिवार्य आहे. याबरोबरच विद्यार्थी विकास मंडळाची "विद्याविकास" व "स्वररंग" हि बोधचिन्हे कार्यक्रमाच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार दोन्ही अथवा किमान एक बोधचिन्ह अनिवार्यतेने समाविष्ट करावीत. तसेच आपले महाविद्यालय /परिसंस्था अथवा शिक्षण संस्था यांची बोध चिन्हे आवर्जून घ्यावीत

संचालक विद्यार्थी विकास मंडळ तसेच संबंधित जिल्हा समन्वयक यांचेशी संपर्कात राहून कार्यशाळेची कार्यक्रम रूपरेषा निश्चित करावी. सदर कार्यशाळेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित आपल्या महाविद्यालयाच्या परिसरातील संबंधित सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्थाशी संपर्क साधून आवश्यकतेनुसार संबंधितांना सहभागी करून घ्यावे.

सदर कार्यशाळा झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत / केंद्रीय लेखा परीक्षणाच्या वेळी हिशेब या विभागास सादर करावा. सोबत विद्यार्थ्यांची यादी, विद्यार्थी अभिप्रायासह (Feedback Form) तसेच या उपक्रमाविषयी प्रातिनिधिक स्वरुपात काही विद्यार्थ्यांची स्फूट टिप्पणी, कार्यशाळेचे फोटो, कार्यवाहीचा अहवाल www.unipune.ac.in-Students Development-BSD Online-College Login-Main Menu-Students' Development-Central Audit-Scheme Proposal FeedBack येथे ऑनलाईन पद्धतीने भरून त्याची प्रत, खर्चाचा तपशील, त्यासबंधीची देयके (नवीन वित्तीय धोरणानुसार) मा. प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच अनुज्ञेय अनुदान आपल्या विहित बँक खात्यात वर्ग करणेबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. कळावे, ही विनंती.

शासन व स्थानिक प्रशासन यांच्याद्वारा प्रचलित कोविड संबंधित आदेश व निर्देशांच्या अधीन राहूनच या योजनेची अंमलबजावणी, पुनर्नियन, स्थगिती अथवा समाप्ती करणे बंधनकारक असून याबाबत महाविद्यालय/परिसंस्थेने आपल्या स्तरावर योग्य ते निर्णय घ्यावेत. याचे कोणत्याही स्तरावर उल्लंघन झाल्यास या योजनेची मान्यता तत्क्षणी रद्दबातल होऊन त्याबाबतची प्रशासकीय/आर्थिक सुरक्षात्मक स्वरूपाची सर्व जबाबदारी महाविद्यालय/परिसंस्थेची असेल. सदर योजना आपल्या महाविद्यालयात दि. ११ मार्च २०२३ पर्यंत राबविणे अनुज्ञेय आहे.

आपला

(डॉ. संतोष परचुरे)
संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

... ईमेल : sdparchure@gmail.com, bsd@unipune.ac.in
... unipune.ac.in/bsd